आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२६ जुलै २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- देशातली परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शी करण्यासाठी नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार कार्य गट स्थापन करण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा

- कारगिल विजय दिनानिमित्त देशाची वीर शहीदांना आदरांजली

- सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीचा निर्धार अधिक दृढ करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधून आवाहन

- गुजरातमधे गेल्या काही दिवसांत पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये ३५ जणांचा मृत्यु /बचाव कार्यात आतापर्यंत सुमारे ८ हजार नागरिकांची सुटका

**आणि**

- तिसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात झिम्बाब्वेला ३५ धावांनी पराभूत करत भारतानं मालिका जिंकली

**<><><><><>**

देशातली परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शी करण्याच्या उद्देशानं तंत्रज्ञान विशेषज्ञ नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार कार्य गट स्थापन केला जाणार आहे. परीक्षा व्यवस्थेसंदर्भात उद्या संसदेत नवीन विधेयकही मांडलं जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खास विडिओ संदेशाद्वारे आज ही माहिती दिली.

**- - - होल्ड - बाईट - पी एम २८ सेकंद - - -**

इसरोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ, माजी शिक्षण सचिव अनिता करवाल, गुप्तचर संस्थेचे माजी संचालक तपन डेका, लॉजिस्टिक्स तज्ज्ञ अमृतलाल मीणा, आय आय टी चेन्नईचे व्ही कामकोटी यांचा या कार्यगटात समावेश आहे.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज स्वीकारला. त्यानंतर त्यांनी बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेतला. शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी आणि विभागातले वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा

दिल्यानंतर काल केंद्रीय ग्राहक व्यवहार आणि नागरीपुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला.

<><><><>

दिल्लीत शांततापूर्ण मार्गानं आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करणारं पत्र लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लिहिलं आहे. आंदोलक विद्यार्थ्यांविरोधात पॅलेट गनसारख्या शस्त्रांचा वापर करण्याला गृहमंत्री या नात्यानं मंजुरी दिली होती का, असा प्रश्नही राहुल गांधी यांनी  विचारला आहे.

दिल्लीत तैनात सुरक्षा दलं केंद्रीय गृहमंत्रालयाला उत्तरदायी आहेत, त्यामुळे या कारवाईला परवानगी कोणी दिली, विद्यार्थ्यांना मारहाण करणारे साध्या वेषातले लोक पोलीस कर्मचारी होते की स्वयंसेवक, त्यांच्या तैनातीला कोणी मंजुरी दिली, असे प्रश्नही त्यांनी विचारले आहेत.

<><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशव्यापी आंदोलन छेडणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली एकता दाखवून देशाच्या लोकशाही इतिहासात सुवर्ण-अध्याय लिहिल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत शिवाजी पार्क इथं आयोजित युवा सभेला संबोधित करत होते. आपल्या हक्कांसाठी युवकांनी जागरूकता कायम ठेवावी, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

आजची ‘जेन-झी’, सरकारला आव्हान देऊ शकते, हे विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाने सिद्ध केल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.

नीट पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल राजीनामा दिल्याच्या पार्श्वभूमीवर, आज मुंबईत शिवाजी पार्क इथं विद्यार्थी  मोठ्या संख्येनं एकत्र आले होते.

<><><><>

कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपकेनं नीट परीक्षा पेपरफूटी विरोधात आंदोलन करून देशातल्या युवकांना सजग केलं आहे असं रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी माहटलं आहे. ते आज लखनौ इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते.

२६ नोव्हेंबरला संविधान दिनाच्या निमित्तानं रिपब्लिकन पक्ष लखनौमध्ये पदयात्रा काढणार आहे. त्यात सुमारे १ लाख कार्यकर्ते सहभागी होतील, असं ते म्हणाले. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही भाजपाकडे ५ जागांची मागणी करू, असं आठवले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कारगिल युद्धात हुतात्मा झालेल्या वीर जवानांना देशानं आज कारगिल विजय दिनानिमित्त आदरांजली वाहिली. कारगिल विजय दिनाचा मुख्य कार्यक्रम  द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकावर झाला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा तसंच लष्करप्रमुख धीरज सेठ आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कारगिल विजय दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांनी वीर सैनिकांना आदरांजली अर्पण केली आहे.

सैनिकांची वीरगाथा देशवासियांना समर्पण आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देत राहील, असं राष्ट्रपतींनी  म्हटलं आहे. आजचा दिवस देशाचं लष्करी सामर्थ्य, राष्ट्रीय एकता आणि मातृभूमीच्या रक्षणासाठीच्या अतूट निर्धाराची साक्ष देतो असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

देशभरात आज कारगिल विजयादिनानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. बुलडाणा जिल्ह्यातल्या खामगाव शहरात नागरिकांनी  ‘एक पेड माँ के नाम’, अंतर्गत वृक्षारोपण करून देशाच्या वीर जवानांना आदरांजली वाहिली.  यावेळी लष्कराच्या १३ महाराष्ट्र बटालियनच्या जवानांनी धावून, आणि वृक्षारोपण करून शाहिद वीरांना आगळीवेगळी मानवंदना दिली.

**<><><><><>**

कारगिल विजय दिनानिमित्त सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीचा निर्धार अधिक दृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात कार्यक्रमातून देशवासियांना केलं. हा या कार्यक्रमाचा एकशे छत्तीसावा भाग होता. कारगिलच्या आव्हानात्मक परिस्थितीपेक्षा आपल्या सैनिकांचा ताठ कणा, दुर्दम्य साहस आणि अढळ आत्मविश्वास मोठा ठरला असं म्हणत त्यांनी हुतात्म्यांना आणि वीर सैनिकांना वंदन केलं.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं केलेल्या क्षेपणास्त्र चाचण्यांचा, तसंच अलिकडेच नौदलाच्या ताफ्यात दाखल झालेल्या स्वदेश निर्मित महेंद्रगिरी या युद्धनौकेचा उल्लेख करुन ते म्हणाले, भारताची संरक्षण उपकरणं आणि तंत्रज्ञानावर जगाचा विश्वास वाढत आहे.

कॅच द रेन मोहिमेच्या आवाहनाला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचं सांगून, त्याअनुषंगानं देशभर सुरु असलेल्या यशदायी प्रयत्नांची तसंच त्यामुळे घडून आलेल्या बदलांची उदाहरणं त्यांनी सांगितली. महाराष्ट्रात नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण्याची क्षमता निर्माण करण्यात आल्याचा उल्लेखही त्यांनी केला. याअनुषंगानं नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले..

**बाईट - आयुष प्रसाद**

पर्यावरण संवर्धनाच्या मुद्यावर बोलताना प्रधानमंत्र्यांनी सांगितलं, की गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी देशातल्या मातीपासून बनवलेल्या मूर्तींंची पूजा करावी या आपल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे, अशा मूर्तींची प्रतिष्ठापना ही निसर्गपूजाच ठरेल असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - MKB GANESHOTSAV**

क्रीडा क्षेत्रात देशानं केलेल्या यशस्वी कामगिरीचा त्यांनी गौरव केला. जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचं विजेतपद पटकावणारी पहिली भारतीय बँडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू, तसंच लॉर्ड्सवर झालेल्या पहिल्या महिला कसोटी क्रिकेट सामन्यात विजय मिळवणाऱ्या भारतीय संघाच्या कामगिरीचं कौतुक त्यांनी केलं.

अलिकडेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या विषयांच्या ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांनी केलेल्या गौरवास्पद कामगिरीचा अभिमानपूर्वक उल्लेख त्यांनी केला.

येत्या ७ ऑगस्टला राष्ट्रीय हातमाग दिन साजरा होणार आहे, त्यानिमित्त त्यांनी सांगितलं, की सरकारी प्रोत्साहनामुळे कारागीर आणि विणकरांच्या जीवनात सकारात्मक बदल झाला आहे. येत्या सणासुदीच्या हंगामात खादी, हातमागाची उत्पादनं खरेदी करावीत, स्थानिक उत्पादनांचा आग्रह धरावा, असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाच्या निमित्तानं 'हर घर तिरंगा या मोहीमेला उत्साहानं पुढे न्यावं, आपल्या घरी पूर्ण आदरानं तिरंगा फडकवावा असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

देशाच्या सीमावर्ती भागात राबवलेल्या विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्रॅममधल्या सहभागी युवकांशी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. मन की बात मधून प्रधानमंत्र्यांनी दिलेल्या संदेशांमधून प्रेरणा मिळाल्याचं युवकांनी या कार्यक्रमात सांगितलं. देशभरातले चारशेहून जास्त युवक या संवादात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

दक्षिण गुजरात आणि लगतच्या परिसरात गेल्या काही दिवसांमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये ३५ जण मृत्युमुखी पडले असून, यात वलसाड आणि नवसारी या दोन जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसल्याचं स्थानिक प्रशासनानं म्हटलं आहे.

भारतीय लष्करानं दक्षिण गुजरात, अहमदाबाद आणि दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातल्या पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये बचाव कार्यात आतापर्यंत ७ हजार ९०० नागरिकांची सुटका केली, तसंच ५२ हजाराहून जास्त नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवल्याचं संरक्षण विभागानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

झिम्बाब्वेमध्ये हरारे इथं आज झालेल्या तिसऱ्या टी-२० क्रिकेट सामन्यात भारतानं झिम्बाब्वेवर ३५ धावांनी विजय मिळवत तीन सामन्यांची हा मालिका एकतर्फी जिंकली.

आजच्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, आणि निर्धारीत २० षटकात ५ गडी गमावून १९२ धावा केल्या. वैभव सूर्यवंशीनं सर्वाधिक ८१ धावा केल्या.

भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना झिम्बाब्वेला २० षटकात ७ गडी गमावून १५७ धावाच करता आल्या. रियान ब्युरीन सर्वाधिक, नाबाद ५४ धावा केल्या.

**//<><><><><>//**